# मेट्रो ३ ला प्रोजेक्ट एक्सलन्स पुरस्कार

**मुंबई :** प्रोजेक्ट मॅनेजर्स ग्लोबल समिट २०२१च्या उद्घाटन समारंभात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला ( मेट्रो ३) प्रोजेक्ट एक्सलन्स अवॉर्ड प्रदान करण्यात आला. आय.पी.एम.ए. चे सदस्य, प्रोजेक्ट मॅनेजमेंट असोसिएट्स (पी.एम.ए.) इंडियाचे प्रादेशिक संचालक टी. श्रीनिवासन यांनी हा पुरस्कार प्रदान केला. राष्ट्रीय स्तरावर निवडलेल्या एकूण चार प्रकल्पांमध्ये कॉर्पोरेशनला हा पुरस्कार मिळाला. प्रोजेक्ट मॅनेजमेंट असोसिएट्सचा वार्षिक कार्यक्रम या वर्षी व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मवर आयोजित करण्यात आला. या वर्षी ग्लोबल समिटची थीम ''प्रोजेक्ट मॅनेजमेंट ऑप्टिमायझेशन फॉर रिझिलियन्स अँड सस्टेनेबिलिटी'' होती. दरवर्षी चांगल्या प्रकारे राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पांना पी.एम.ए. राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार एक सन्मान आहे आणि तो आम्हाला नक्कीच प्रोत्साहन देईल. आधुनिक अभियांत्रिकी प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी प्रेरणा देखील देईल,असे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल म्हणाले.